Pune Police

# प्रेसनोट दि. २७/०१/२०१७

## सराईत गुन्हेगारा कडून देशी बनावटीचे एक पिस्टल व चार जिवंत काडतूसे युनिट १ गुन्हे शाखेच्या टिम कडून हस्तगत.

आगामी महानगर पालीका निवडणूकींच्या तोंडावर गुन्हे शाखेच्या युनिट १ पथकाने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ०१ नामचिन व सराईत गुन्हेगारास रंगेहाथ पकडून त्याचेकडून ०१ बेकायदेशीर पिस्तूल व ०४ जिवंत काडतूसे असे अग्निशस्त्र जप्त करण्यात आले आहे.

वरिष्ठ पो. निरीक्षक श्री. नितीन भोसले पाटील, यांचेसह युनिट १ गुन्हे शाखेचे कर्मचारी वाहन चोरीचे गुन्हयात आरोपींचा शोध घेणेकामी फिरत असतांना स.पो.फौज.संभाजी भोईटे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, ०१ सराईत गुन्हेगार भाजी मंडई, विश्रामबाग, पुणे येथे त्याचेकडील बेकायदेशीर शस्त्र व चार जिवंत काडतूसे जवळ बाळगून फिरत आहे.

त्यानूसार युनिट १ च्या पथकाने सदर ठिकाणी छापा मारून आरोपी नामे १) उमेश बाळासाहेब काळभोर वय- ३५ वर्षे, रा- धायरी गाव, सर्व्हे.नं.५४ पुणे याचेकडून ०१ पिस्टल व ०४ काडतूसे असा एकूण रु. २५,८००/- किंमतीचे अग्निशस्त्र जप्त करण्यात आले आहे. अटक आरोपी याच्यावर खून व शरीराविरूध्दचे गुन्हे दाखल असून तो नुकताच ३२ महिने येरवडा कारागृहात राहून सुटला असून सध्या तो महानगर पालीकेच्या निवडणूकीच्या निवडणूकीच्या धर्तीवर सक्रीय असलेबाबत गोपनिय माहिती मिळाली आहे. सदर बाबत विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई सदरची कारवाई ही श्री. दिपक साकोरे, अतिरीक्त कार्यभार अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री पी.आर.पाटील, पोलीस उप आयुक्त, गुन्हे. श्री सुरेश भोसले, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोउपनिरी दिनेश पाटील, सपोफौज. शशिकांत शिंदे, रविंद्र कदम, संभाजी भोईटे, पो.हवा. रिजवान जिनेडी, प्रकाश लोखंडे, मेहबुब मोकाशी, उमेश काटे, श्रीकांत वाघवले, इरफान मोमीन, तुषार खडके, सुधाकर माने, सुभाष पिंगळे, अशोक माने, प्रशांत गायकवाड, मोहन येलपले यांनी केली आहे.

# प्रेस नोट

## रात्री घरफोडी व रेल्वे मधून मोबाईल व रोख रक्कम चोरी करणारे सराईत गुन्हेगार जेरबंद

वाकड पोलीस स्टेशन च्या हद्दीत रात्रीच्या घर फोडी गुन्हयामध्ये वाढ झाल्याने गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त श्री दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त श्री पी.आर. पाटील, सहा पोलीस आयुक्त श्री सुरेश भोसले यांनी सदर गुन्हयांची उकल लवकरात लवकर करुन आरोपींना जेरबंद करण्याचे आदेश दिले होते.

सदर आदेशान्वये युनिट २ चे प्रभारी अधिकारी यांनी चोरी झालेल्या गुन्हयांचा सखोल अभ्यास केला असता रात्रीच्या घर फोडी गुन्हयामध्ये खिडकीच्या शेजारी असलेल्या दरवाजा उघडून घरफोडी झाल्याचे काही गुन्हे निदर्शनास आले त्यावरुन सदर प्रकारचे गुन्हे करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगार यांची माहिती घेवून सदर संशयित आरोपींचा शोध घेवून त्यांना तात्काळ जेरबंद करण्याबाबतचे युनिट २ मधील कर्मचारी यांना आदेश दिले होते.

त्याप्रमाणे वाकड पो.स्टे.चे हद्दीत युनिट २ चे कर्मचारी घरफोडी करणारे गुन्हेगारांचा शोध घेणे व सदर प्रकारचे गुन्ह्यांना प्रतिबंध करणेकामी पेट्रोलींग करत असताना पोहवा राजकुमार तांबे व पोना अतुल गायकवाड यांना त्यांचे बातमीदार मार्फत खात्रीशिर बातमी मिळाली की, काळेवाडी येथील राहणारे खिडकीच्या शेजारी असलेल्या दरवाजा उघडून घरफोडी करणारे संशयित आरोपी हे जोतिबा उदयान पवनानगर, काळेवाडी येथे नंबर प्लेटवर १२ नं. असलेल्या पॅशन मोटारसायकलवर थांबलेले असून ते कोणाचीतरी वाट पहात आहेत. गुन्हे शाखा युनिट २ चे स्टाफसह सदर ठिकाणी गेले असता एक पिवळया रंग असलेला शर्ट व काळे रंगाची पॅन्ट घातलेला इसम तसेच त्याचे सोबत एक हिरव्या चौकटी रंगाचा नक्षी असलेला शर्ट व निळे रंगाची जिन्स पॅन्ट घातलेला इसम हे संशयित असून तेच रात्रीची घरफोडी करणारे आरोपी असल्याचे बातमीदाराने खात्रीलायक सांगितल्याने लागलीच छापा घालून सदर २ इसमांना ताब्यात घेवून त्यांना त्यांचे नाव व पत्ता विचारता त्यांनी १) प्रमोद प्रकाश डवरी, वय २५, रा. हनुमानमंदिराशेजारी, काळेवाडी गावठाण पुणे २) राहुल दत्तात्रय जाधव, वय २२, रा. श्रीकृष्ण कॉलनी नं. १ काळेवाडी पुणे अशी सांगितली. त्यांची अंगझडती घेतली असता अ.क्र. १ याचे पॅन्टचे खिशामध्ये एक सॅमसंग जे १ कंपनीचा मोबाईल मिळून आला. त्यावेळी त्यांचेकडे सदर मोबाईल बाबत चौकशी केली असता त्यांनी सदरचा मोबाईल हा काळेवाडी येथून घरफोडी करुन चोरी केल्याचे कबूल केले. त्याअन्वये त्यांचेकडे आणखीन चौकशी केली असता त्यांनी आणखीन १५ मोबाईल घरफोडी व रेल्वेमधून चोरी केल्याचे कबूल करुन वेगवेगळया लोकांना विकल्याचे सांगितले. त्याप्रमाणे सदर मोबाईल ताब्यात घेण्यात आले असून आरोपीकडे मिळून आलेल्या मोबाईल बाबत व ज्याठिकाणी घरफोडी केली त्याठिकाणची माहिती घेत असताना अ.क्र. १ याचेकडे मिळून आलेला सॅमसंग जे १ हा मोबाईल वाकड पो.स्टे. गु.र.नं. १८/२०१७, भादवि क. ४५७,३८०, या गुन्हयातील असल्याचे निष्पन्न झाले. तसेच इतर मोबाईल पैकी ३ मोबाईल बाबत वाकड पो.स्टे. गु.र.नं. ५२/२०१७, भादवि. ४५७,३८०, पुणे रेल्वे पो.स्टे. गु.र.नं. ३२/२०१७, भादवि क. ३७९,३५६,३४, पुणे रेल्वे पो.स्टे. गु.र.नं. ३३/२०१७, भादवि ३७९ असे गुन्हे दाखल असून एकुण ४ गुन्हे आरोपीने केल्याचे निष्पन्न झाल्याने उघडकीस आलेले आहेत.

आरोपीकडून एकूण १६ मोबाईल किं.रु. ३,१०,०००/- व गुन्हया करतांना वापरलेली हिरोहोंडा पॅशन मोटारसायकल कि.रु. ६५,०००/- असा एकूण ३,७५,०००/-रुपयाचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीकडून आणखीन घरफोडीचे व रेल्वेतील चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

वरील प्रमाणे कारवाई मा. दिपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे मा. पी.आर. पाटील, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, मा. सुरेश भोसले, सहा पोलीस आयुक्त, गुन्हे १, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक सतिश निकम, पोलीस कर्मचारी राजकुमार तांबे, अतुल गायकवाड, राजू केदारी, अनिरुध्द सावर्डे, दिपक खरात, रेवणसिध्दा नरोटे, प्रसाद जंगीलवाड, अतुल मेंगे, विशाल भिलारे, सुहास कदम, यांनी केलेली आहे.


युनिट २, गुन्हे शाखा
गुन्हे शाखा
युनिट-१
पुणे शहर
गुन्हे शाखा